क्रमांक: एलआरएफ ४९९०/२३०८३८/प्र.क्र.२०६/९०/ज-८
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३ जानेवारी, १९९१.

विषय : जमीन: नागपूर
खसरा क्रमांक १२७/३ मौजा डिगडोह, तालुका हिंगणा
लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था, नागपूर
यांना इंजिनियरींग महाविद्यालयासाठी मंजूर करणेबाबत...

ज्ञापन :-

आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना त्यांच्या उपरोक्त विषयावरील क्रमांक एलएनडी-३/१२१/१९९०/९-३/१९९० दिनांक ९ ऑक्टोबर, १९९० च्या पत्रास अनुलक्षून कळविण्यात येते की मौजा डिगडोह, तालुका हिंगणा जिल्हा नागपूर येथील खसरा क्रमांक १२७/३ मधील १३.०३ हेक्टर जमीन लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था, नागपूर यांना नियोजित इंजिनियरींग महाविद्यालयासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम ४० नुसार नेहमीच्या अटी व शर्तींवर, जिल्हाधिकाऱ्यांना योग्य वाटतील अशा इतर अटी व शर्तींवर तसेच पुढील अटींवर मंजूर करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

[१] विनाअनुदानीत शिक्षण संस्थांना जमिनी मंजूर करताना संस्थेकडून जमिनीची कब्जेहक्काची किंमत वसुल करावी किंवा कसे याबाबत शासनाकडे विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर होणाऱ्या अंतिम निर्णयास संस्था बांधिल राहील. याप्रकारे संस्थेकडून लेखी हमीपत्र घेण्यात येऊन त्यानंतरच जागेचा प्रत्यक्ष ताबा संस्थेस देण्यात यावा.

२. हे आदेश शिक्षण व सेवायोजन विभाग, वन विभाग, नगर विकास विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८८०/९१/व्यय-९, दिनांक २/१२/९१ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ मोहन पांढरकामे ]
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग.

प्रति

आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.

[कृ.मा.पृ.]

क्रमांक:एलआरएफ ४९८९/२६९४८/प्र.क्र.६४/ज-८

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ४, एप्रिल, १९९४

विषय :- जमीन - नागपूर

सर्व्हे क्र.१२७/२ मौजे डिगडोह ता. हिंगणा जि. नागपूर येथील जागा शैक्षणिक संस्थाना शैक्षणिक प्रयोजनासाठी मंजूर करण्याबाबत.

ज्ञापन :-

जिल्हाधिकारी नागपूर यांना त्यांच्या क्रमांक राजस्व/कार्या-६/काचि ३१२०/१९९२ दिनांक २१.१२.१९९२ च्या पत्रास अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्याचा मला निदेश आहे की मौजे डिगडोह तालुका हिंगणा जिल्हा नागपूर येथील सर्व्हे क्र.१२७/२ मधील राज्य राखीव पोलीस दलास फिल्ड फायरींग रेंज करीता सन १९६४ साली हस्तांतरीत केलेली ६.७७ हेक्टर जमीन [ १७ एकर] राज्य राखीव पोलीस दलाकडून [गृह विभाग] पुनर्ग्रहित करुन खालील शैक्षणिक व स्वायत्त संस्थांना ~~xxxx~~ देण्यासंबधीचा निर्णय शासनाने घेतला आहे.

[अ] लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था नागपूर या संस्थेस संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयास पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या जमीनी समोरील लागून असलेली ३.२८ हेक्टर जमीन संस्थेच्या शारिरीक शिक्षण महाविद्यालयाकरीता देण्यात यावी.

[ब] अंकुश शिक्षण संस्था, नागपूर या संस्थेस २.७२ हेक्टर इतकी जमीन तंत्रनिकेतनासाठी देण्यात यावी.

[क] उर्वरीत ०.७७ हेक्टर जमीन ग्राम पंचायत डिगडोह यांना पाण्याच्या टाकीकरीता देण्यात यावी.

२. प्रस्तुतची जमीन वरील शैक्षणिक संस्थाना व स्वायत्त संस्थेला महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या व त्यानुसार तयार करण्यात आलेल्या नियमातील अटी व शर्ती, तसेच शासन परीपत्रक दिनांक ८.२.१९८३ मधील परिच्छेद १० व ११ मध्ये उल्लेखिलेल्या अटी व शर्ती व जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी व शर्तीवर देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांचेकडून करण्यात येईल.

-२-